# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## जाहिर सूचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी नगर पथ विक्रेता समिती गठीत करावयाची असून नगर पथ विक्रेता समितीमधील सदस्यापैकी पथ विक्रेत्यांचे प्रतिनिधी व्यतिरिक्त अन्य प्रवर्गातील सदस्यांची नगर पथ विक्रेता समिती गठीत करण्याबाबत शासनाने निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार "महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन)(महाराष्ट्र) नियम,२०१६ मधील नियम नियम ११ (२) (ख) (दोन) ते ११ (२) (ख) (पाच) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील संघटनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तीची नगर पथ विक्रेता समितीवर नियम १२ मध्ये नमुद निकषाच्या आधारावर सदस्य म्हणून नेमणूक करण्याकरीता अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना, निवासी कल्याण संघ, व्यापारी संघ व पणन संघ इ. संघटनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तीकडून अर्ज मागविण्यासाठी दि.८-१२-२०१६, दि.१-३-२०१७ व दि.११-४-२०१७ रोजी वर्तमानपत्रात जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिर सूचनेत नमुद कालावधीमध्ये अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना, निवासी कल्याण संघ, व व्यापारी संघ या प्रवर्गातील संघटनांच्या प्रतिनिधीचे पदसंख्ये नुसार आवश्यक अर्ज प्राप्त झालेले आहेत. परंतु सदर कामी तीनदा जाहिर सूचना प्रसिध्द करुन देखील पणन संघ (Representative of Market Association) या प्रवर्गासाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही. त्यामुळे खाली नमुद प्रवर्गातील संघटनेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तीकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| नियम | इतर मंडळे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| निमय ११ (२) (ख) | (पाच) पणन संघाचा प्रतिनिधी (Representative of Market Association) | ०१ |

खालील अटी/शर्तींची पुर्तता करणाऱ्या व या प्रवर्गातील संघटनेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तींनी आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे नावे प्रशासकीय भवन येथील नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, पाचपाखाडी, चंदनवाडी, ठाणे (प.) येथे ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून **१५ दिवसाचे** आत आवश्यक कागदवत्रासह लेखी अर्ज सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या व अपुर्ण कागदपत्रासह सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील प्रमाणे नमुद प्रवर्गा व्यतिरिक्त अन्य प्रवर्गासाठी अर्ज केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

**अटी/शर्ती :-** (१) संघटनेची किंवा संघाची नोंदणी, क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे केलेली असावी.

(२) संघटना किंवा संघ मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करील.

(३) संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळया यादीत टाकलेले नसावे.

(४) संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिध्ददोषी असणार नाहीत.

(५) संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.

मा.महापालिका आयुक्त तथा अध्यक्ष, नगर पथ विक्रेता समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे मान्यतेने.

उपआयुक्त
अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग
ठाणे महागनरपालिका, ठाणे.